पुण्य नगरी

# आजही मुलगी झाल्यानंतर काही वडील तिचे तोंड पाहत नाहीत – शंकर महादेवन

**मुंबई:** एकीकडे आपण महिला, देवींची पूजा करतो. आपल्याच देशाचा उल्लेख 'भारत माँ' म्हणून करतो, तर दुसरीकडे महिलांच्या हातात नसलेल्या गोष्टींसाठी त्यांना जबाबदार धरले जाते, सामाजिक कलंक लावला जातो. इतकेच नव्हे तर अजूनही भारतात मुलगी झाल्यानंतर वडील काही दिवस तिचे तोंड पाहत नाहीत, अशी खंत सुप्रसिद्ध गायक पद्मश्री शंकर महादेवन यांनी व्यक्त केली.

सिंगापूरस्थित भारतीय लेखिका माला महेश यांच्या 'पद्मा' पुस्तकाचे प्रकाशन वांद्रे येथे एका कार्यक्रमात गायक आणि संगीतकार पद्मश्री शंकर महादेवन यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुस्तक प्रकाशनानंतर त्यांनी 'तारे जमीपर' चित्रपटातील त्यांचे 'माँ' हे गीत सादर करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी माला यांनी पुस्तकातील उतारे आणि पद्माच्या कल्पनेबद्दलचे त्यांचे अनेक विचार मांडले. त्या म्हणाल्या की, माझ्या आजीने मला वंध्यत्वाच्या मुद्द्यावर काही सत्य घटना सांगितल्या. त्या काळापासून आतापर्यंत, स्त्रीचे मूल्य त्यांच्या मुले जन्माला घालण्याच्या क्षमतेवर मोजले जाते. त्यांच्या नियंत्रणाबाहेरील गोष्टीबद्दल त्यांना दोष देण्यात आला. जोडप्यामध्ये समस्या पुरुषाबरोबर असू शकते, परंतु ते हे सत्य स्वीकारले जात नाही. मला असे वाटले की या स्थितीसाठी स्त्रियांना दोष देणे चुकीचे आहे. ही परिस्थिती स्त्रीच्या भावना, मानसिकता आणि कुटुंबावर कसा परिणाम करू शकते यावरच आधारित ही कथा आहे, असे त्या म्हणाल्या.



**Smart Mumbai**
Page No.4 June 06, 2022